

# || समर्थ वास्तु ||


## वर्षा मोरे

संपर्क: ९०६७०१२६६७

*varsha.samarthavastu@gmail.com*

*https://www.homeminister.com/B/XZUMICC*




घरातील देव्हारा ही देवाच्या प्रार्थनेची पवित्र जागा असते. देव्हा-याची जागा हा घराचा अत्यंत शांत भाग असला तर तेथे दैवी शक्ती भरून राहते. ही अशी जागा आहे जेथे आपण परमेश्वराशी लीन होतो आणि त्याची शक्ती आपल्याला प्राप्त होते. म्हणूनच तिथे सकारात्मक वातावरण आणि शांतता असणे गरजेचे असते. घरात स्वतंत्र पूजेची खोली असणे अगदी चांगले असले तरी मोठ्या शहरांमध्ये जागेच्या उपलब्धते अभावी ते नेहमीच शक्य होत नाही.

ईश्वराचे अधिष्ठान हे ईशान्य दिशेला असल्यामुळे, देव्हा-याची योग्य जागा ईशान्य कोप-यातच असावी. वास्तूच्या ईशान्य कोप-यात देव्हा-याचे तोंड पश्चिमेस असले तरी चालते. ईशान्य कोपरा शक्य नसल्यास, उत्तरेकडे किंवा पूर्वेकडे देव्हारा ठेवला तरी हरकत नाही. देव्हारा वास्तूच्या अगर त्या खोलीच्या दक्षिण भिंतीजवळ अगर नैऋत्य कोप-यात केव्हाही असू नये,असल्यास अति पीडा उद्भवण्याचा संभव असतो. देव्हारा शयनगृहात नसावा. जर शक्य नसेल तर निदान देव्हा-यासमोर लाकडी पार्टिशन किंवा पडद्याची व्यवस्था कायमस्वरूपी करण्यात यावी. देव्हा-याच्या वर किंवा खाली शौचालय अजिबात नसावे.

घरात देव्हारा करताना सर्वात महत्त्वाचे म्हणजे देव्हारा थेट जमिनीवर ठेवू नये. देव्हारा ठेवायला स्वतंत्र खोली शक्य नसेल तर एक चौथरा तयार करावा व त्यावर देव्हारा ठेवावा. देव्हारा संगमरवरी किंवा लाकडी असावा. अक्रिलिक किंवा काचेचा देव्हारा टाळावा. देव्हरा-याला कळस असू नये. देव्हा-यात मूर्तींची गर्दी करू नये. एकाच देवतेच्या अनेक मूर्ती ठेवू नयेत.  देव्हरा-यात ठेवलेले फोटो अथवा मूर्ती चिरा गेलेल्या किंवा इतर नुकसान झालेल्या नसाव्यात कारण ते अमंगल समजले जाते.

देव्हा-याची जागा वास्तुशास्त्राला अनुसरून ठरवली तर घरामध्ये सुखसमृद्धी नांदते. देव्हा-याची जागा योग्य दिशेला नसेल तर अनेक अडचणी उद्भवण्याचा संभव असतो. देव्हा-याची जागा बदलत असताना नेहमी आपल्या वास्तुशास्त्र सल्लागाराचा सल्ला घ्यावा.